# नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग

**नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, तळमजला, भू.क्र.1, किल्ले गांवठाणजवळ, सेक्टर-15ए,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवीमुंबई-400614. दुरध्वनी क्रमांक :022-27567067 ईमेलआय.डी.** nmmcedu@gmail.com.


---

जा.क्र.नमुंमपा/शि.वि./2751 /2018
नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग
दिनांक : - 25/ 05 /2018

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
मनपा/खाजगी व्यवस्थापनाच्या प्राथमिक/माध्यमिक सर्व शाळा,
नवी मुंबई.

**विषय:- 'गोवर रूबेला लसीकरण कार्यक्रम २०१८' राबविणेबाबत.**

संदर्भ :- १) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पत्र क्र. अमाशा/माध्य-अ/३०५/शालेय/लसीकरण/२०१८/३८४७, दिनांक १६/०७/२०१८.
२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा, मा. आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा, मा, आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र.

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. पत्र संलग्न.

भारत सरकारने सन २०२० सालापर्यंत गोवर या आजाराचे निर्मलून व रूबेला आजाराचे नियंत्रण करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यास्तव, महाराष्ट्र राज्यात नोव्हेंबर २०१८ मध्ये गोवर रूबेला लसीकरण मोहीम आयोजित करण्यात येणार आहे. या लसीकरण मोहीमेंतर्गत ९ महिने ते १५ वर्षे वयोगटातील (इयत्ता १०वी पर्यंत) विद्यार्थ्यांना रूबेला लसीचे इंजेक्शन दिले जाणार आहे. सदर गोवर रूबेला लसीकरण संदर्भात आपल्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांना दैनंदिनी/ईमेलद्वारे सूचीत करण्यात यावे. तसेच शाळेच्या सूचना फलक व संकेतस्थळावर या उपक्रमास प्रसिध्दी देण्यात यावी.

आपणांस ईमेलद्वारे प्राप्त झालेल्या मिझल्स रूबेला मोहीम फॉर्म क्र. १ व फॉर्म क्र. ७ एफ. मध्ये तात्काळ माहिती भरून सोबत जोडलेल्या यादीमधील नजिकच्या नागरी आरोग्य केंद्रात सादर करण्यात यावी. तसेच फॉर्म क्र. ७ एफ. फॉर्म मध्ये नमूद केल्यानुसार शाळास्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करून त्याची छायाचित्रे व व्हिडीओ तयार करण्यात यावे.

सदर मोहीमेची जनजागृती होणेसाठी शाळास्तरावर रॅलींचे आयोजन करून व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

आरोग्य विभागाचे अधिकारी या संदर्भात आपलेशी संपर्क साधतील त्यावेळी त्यांना गोवर रूबेला लसीकरण कार्यक्रमासंदर्भात आवश्यक ते सर्व सहकार्य करावे.

(संदीप संगवे)
शिक्षणाधिकारी
नवी मुंबई महानगरपालिका

प्रत : माहितीस्तव सादर.
१) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे,
२) मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग मुंबई.
३) वैद्यकिय अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका

प्रत :- केंद्रसमन्वयक, समूहसाधन केंद्र ---------------------- यांना कार्यवाहीस्तव रवाना.
आपण आपल्या केंद्रातील सर्व शाळांचे फॉर्म नागरी आरोग्य केंद्रात जमा होतील, याची दक्षता घ्यावी.

Government of Maharashtra
Commissionerate of Education, Maharashtra State
Central Building, Dr. Annie Besant Road
Pune - 411 001.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य
मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग
पुणे - ४११ ००१

क्र.अमाशा/माध्य-अ/३०५/शालेय आरोग्य/लसीकरण/२०१८/ 3८४ दिनांक १६.०७.२०१८

प्रति,
१. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व )
२. शिक्षणाधिकारी( प्राथमिक/माध्यमिक)
जिल्हा परिषदा, (सर्व)
३. शिक्षण निरिक्षक,
बृहन्मुंबई (पश्चिम/उत्तर/दक्षिण)

विषय:- गोवर रुबेला लसीकरण मोहिमेबाबत.
संदर्भ:- केंद्र शासनाचे पत्र क्रं ९-४/२०१७- इइ.११, दि.१०/२/२०१७

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आरोग्य विभागामार्फत गोवर रुबेला या आजारावर शालेय विद्यार्थ्यांना लसीकरण करण्यांत येणार आहे. भारतात गोवर रुबेला लसीकरणाची सुरवात फेब्रुवारी २०१७ पासून करण्यात आलेली आहे. हया मोहिमअंतर्गत ३० मे २०१८ पर्यंत १९ राज्ये/केंद्र शासित प्रदेशामध्ये मोहिम यशस्वीरित्या राबविण्यांत आलेली आहे व यामध्ये जवळपास ९ कोटीहून अधिक बालकांचे लसीकरण करण्यांत आले आहे. महाराष्ट्र राज्यात ही मोहिम नोव्हेंबर,२०१८ पासून सुरु होणार आहे. संक्षिप्त स्वरुपात गोवर रुबेला आजाराबाबतची माहिती मराठी व इंग्रजी मध्ये यासोबत जोडून पाठविण्यांत येत आहे.

गोवर रुबेला लसीकरण मोहिम सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा/तालुका/शाळास्तरावर कार्यशाळा/प्रशिक्षण घेण्यांत येणार आहे व या प्रशिक्षणामध्ये त्या त्या स्तरावरील नोडल अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. आरोग्य विभागाचे अधिकारी आपल्याशी संपर्क साधतील त्यावेळी त्यांना या गोवर रुबेला लसीकरणासाठी आवश्यक ते सहकार्य करावे तसेच यासाठी देण्यांत येणाऱ्या प्रपत्रामध्ये अहवाल संबंधित विभागास व या कार्यालयास पाठवावा.

(विशाल सोळंकी,भा.प्र.से.)
आयुक्त,(शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रतिलिपी :
मा.अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर
डॉ.चेतन खाडे, सर्व्हेक्षण वैद्यकिय अधिकारी, जागतिक आरोग्य संघटना,पहिला मजला,कुंटूब कल्याण भवन,पुणे

E-mail : commissionereducation.mh@gmail.com, Website – www.education.maharashtra.gov.in
Off.Tel.No.: 020-26120141
D:\Dhiwar Steno\Govar rubell letter.docx

E-mail : commissionereducation.mh@gmail.com
Tel. No.: 020 - 26120141
Website : www.education.maharashtra.gov.